# स्त्रियांचा लैंगिक छळ प्रतिबंध

## - पार्श्वभूमी -

भारतीय समाजामध्ये स्त्रीचे स्थान हें नेहमीच दुय्यम पातळीचे समजले गेले आहे. मुलगी जन्माला आल्यापासून ती ज्या सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक त्याचप्रमाणे आर्थिक प्रक्रियांमधून मोठी होत जाते त्यातही तिचे स्थान निश्चित होत जाते. वाढते लैंगिक अत्याचार, वाढते हुंडाबळी ही सर्व तिच्या असमाधानाची निदर्शक आहेत. मुळात स्त्रियांना समाजात समान स्थान द्यायचे असेल तर तिच्याबाबतीत खालील कल्पना बदलायला हव्यात -

१. स्त्री उपभोगाची वस्तू आहे.

२. स्त्रीचे प्रमुख काम मुलांना जन्म देणे, त्यांचे संगोपन करणे आणि घरकाम करणे हे आहे.

३. स्त्रीने आपल्यावर होणा-या अन्यायाबाबत गप्प राहिले पाहिजे तरच घराची अब्रू, नातेवाईकांची प्रतिष्ठा सुरक्षित राहील.

४. स्त्रीने उत्पादक श्रम, म्हणजे नोकरी नाईलाज असेल तरच करावी, इ.

आजपर्यंतचा सामाजिक व्यवहार तपासून पाहिला असता या कल्पना पुरूषांच्याच नव्हे तर पारंपारिक पध्दतीने स्त्रियांच्याही डोक्यात ठाम बसून गेलेल्या दिसून येते. हे बदलणे आज काळाची गरज निर्माण झाली आहे. विशेषत: शिक्षण क्षेत्रात काम करणा-या सर्व व्यक्ती आणि घटक यांनी खूप मोठी जबाबदारी उचलायला हवी, कारण समाजातील बदल व वैचारिकतेमधील सुधारणा तेच घडवून आणू शकणार आहेत. या मंडळींनी आपल्या संस्थेत, महाविद्यालयात, अधिविभागात अथवा कार्यालयात असणा-या महिला, विद्यार्थिनी, प्राध्यापिका वा कर्मचारी सुरक्षित वातावरणात व कोणत्याही लैंगिक अवहेलनास बळी न पडता काम करू शकेल असे वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. ही जाणीव जागृती करण्यासाठी काय करता येईल याचा जेंव्हा आपण विचार करतो तेंव्हा संस्था चालक, प्राचार्य, विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि पालक यांच्या मूळ मानसिकतेमध्येच सकारात्मक बदल घडवून आणणे आत्यंतिक गरजेचे आहे आणि ते आवश्यकही आहे. त्यात केवळ स्त्रियांनाच जाणीव जागृतीचे लक्ष्य न करता पुरूषांचेही प्रामुख्याने मोठया प्रमाणात प्रबोधन करायला हवे आहे. हे कार्यक्रम पुढीलप्रमाणे असावेत -

१. लैंगिक छळाबाबतची साक्षरता वाढवणे - त्यासाठी भित्तीपत्रके, सूचनाफलक अन्य ठळक दर्शनी भाग येथे लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याची/ परिनियमांची/ त्यासंदर्भातील समिती व सदस्यांची माहिती प्रसृत करणे.

२. बाल्याअवस्थेतून तारूण्यात येणा-या/ आलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनींमध्ये लैंगिक दाबींबद्दल असलेले अज्ञान दूर करणे, त्याचप्रमाणे त्यांचे अज्ञानाबाबत त्यांना योग्य मार्गदर्शन करणे.

३. स्त्री पुरूष समानता पुरस्कारणारे विविध कार्यक्रम संयोजित करणे.

४. विद्यार्थी/ विद्यार्थिनी यांच्यामध्ये [illegible] संबंध तयार होण्याच्या दृष्टीने त्यांचा एकत्रित गट तयार करून वा वेगवेगळे गट क[illegible]र्यक्रम तयार करणे.

५. स्त्रियासंबंधीच्या विविध कायद्यांची साक्षरता वाढविण्याच्या दृष्टीने सामाजिक कार्यकर्ते, वकील आदींचे सहकार्य घेणे.

६. विद्यार्थी/ विद्यार्थिनींच्या लैंगिक समस्यांविषयी त्यांना तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन करणे, समिती तयार करणे.

७. संस्था चालक, प्राचार्य यांचे मेळावे, बैठका घेवून यासंदर्भात काय करता येईल याबाबत ठोस विचारविनिमय करणे, त्यांची जाणीवजागृती करणे तसेच परस्पर माहितीची देवाणघेवाण करणे, उपक्रमांची चर्चा करणे.

८. महाविद्यालयात वाढवून दिलेल्या शुल्क निधीमधील काही वाटा त्यांनी स्त्री पुरुष समानतेबाबतची पुस्तके, चित्रफिती, चित्रपट प्रदर्शन आदींसाठी वापरावा हे त्यांना बंधनकारक करण्यात यावे.

९. पालकांचे मेळावे घेवून त्यांच्यामध्ये व त्यांच्या पाल्यांमध्ये असणा-या संबंधाबाबत जाणीवजागृती करणारे उपक्रम घेणे, त्यांची पारंपारिक मानसिकता, भय, दडपण व अज्ञान बदलून प्रगत जाणिवा निर्माण करणे, परस्पर विश्वासाचे वातावरण तयार करणे.

१. संज्ञा -

लैंगिक छळ म्हणजे काय?

स्त्रियांचा कामाच्या ठिकाणी त्या स्त्री आहेत म्हणून दडपण आणणारे, असुरक्षितता, भय व तणाव तयार करणारे व त्यांच्या कार्यक्षमतेवर विपरित व प्रतिकूल परिणाम करणारे असे लैंगिक हेतूने प्रेरित असलेले, प्रत्यक्ष वा सूचक वर्तन म्हणजे लैंगिक छळ होय. सुप्रीम कोर्टाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील गोष्टींचा समावेश लैंगिक छळामध्ये होईल.

उदाहरणार्थ -

१. स्त्रियांना शरम, संकोच व अवमान वाटेल असे वर्तन व हावभाव करणे वा तशी भाषा वापरणे, उदा. त्यांच्या शरीरास स्पर्श करणे, असभ्य कॉमेंटस मारणे, घाणेरडी शेरेबाजी आणि विनोद करणे, तशी पत्रे, इ-मेल पाठविणे, अश्लिल साहित्य/ चित्रे दाखविणे, टक लावून पाहणे, शिटया मारणे, धक्के मारणे, फुले फेकणे, विनयभंग करणे इत्यादी

२. अध्यापन/ संशोधन/ नोकरी शैक्षणिक संस्थांमधील अन्य उपक्रमातील सहभाग/ लेखी, तोंडी प्रात्यक्षिक परीक्षेतील मूल्यमापन इत्यादींच्या संदर्भात स्त्रियांकडे लैंगिक संबंधाची मागणी करणे, त्यासाठी त्यांच्यावर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दडपण आणणे इत्यादी.

३. स्त्रियांना संकोच, शरम, भय, असुरक्षितता वाटेल अशा पध्दतीने लैंगिक आक्रमण करणे, उदा. आपल्या शारीरिक अवयवांचे त्यांच्यासमोर लैंगिक हेतूने प्रेरित होवून प्रदर्शन करणे इत्यादी.

अशा प्रकारचे वर्तन वा घटना महाविद्यालय/ संस्था, पदव्युत्तर विभाग, कार्यालये यांच्या परिसरात अथवा बाहेर घडलेली असली तरी जर ती महिला महाविद्यालय/ संस्थेशी विद्यार्थिनी/ कर्मचारी/ प्राध्यापिका/ अभ्यागत/ संशोधक आदी नात्यांनी संबंधित असेल तर ती या तरतूदीत समाविष्ट आहे.

२. महाविद्यालयीन स्तरावरील लैंगिक छळ प्रतिबंधक समिती -

प्रत्येक महाविद्यालयाच्या पातळीवर पुढीलप्रमाणे लैंगिक छळ प्रतिबंधक समिती स्थापन करण्या यावी. समितीच्या सदस्यांपैकी किमान ५० टक्के महिला असतील व समितीच्या अध्यक्ष पदावर महिलाच असेल.

समितीचे सदस्य पुढीलप्रमाणे राहतील -

१. दोन प्राध्यापक - पैकी किमान एक महिला - प्राचार्याकडून नामनिर्देशित

२. दोन विद्यार्थी प्रतिनिधी - पैकी किमान एक महिला- विद्यार्थी मंडळाकडून नामनिर्देशित

३. एक स्थानिक कायदेतज्ज्ञ/ वकील शक्यतो महिला- प्राचार्याकडून नामनिर्देशित,

४. स्वयंसेवी संस्थेची महिला प्रतिनिधी - प्राचार्याकडून नामनिर्देशित. प्राचार्य या समितीच्या महिला सदस्यांपैकी एका सदस्यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करतील.

५. लैंगिक छळ प्रतिबंधक समितीच्या सदस्यांचा कार्यकाल समितीच्या पहिल्या बैठकीपासून पाच वर्षांचा राहील. मात्र समितीचा सदस्य, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी किंवा अन्य यांचे मूळ पद संपुष्टात आले तर त्यांचे सदस्यत्वही संपुष्टात येईल.

६. विहीत केलेल्या कार्यपध्दतीप्रमाणे रिक्त जागा भरल्या जातील.

७. एका शैक्षणिक वर्षात समितीच्या किमान तीन बैठका घेण्यात येतील.

८. समितीच्या बैठकीसाठी गणसंख्या एकूण सदस्यांच्या ३० टक्के असेल.

समितीचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील -

१. महाविद्यालय/ मान्यताप्राप्त संस्था येथे या परिपत्रकाची अंमलबजावणी काटेकोर रितीने होत आहे ते पाहणे.

२. लैंगिक छळ म्हणजे काय याबाबत परिपत्रकातील माहिती महाविद्यालयात/ संस्थेत सर्वांच्या ठळकपणे नजरेत येईल अशा रितीने प्रदर्शित करणे.

३. लैंगिक छळासंदर्भात येणा-या लेखी/ तोंडी, वैयक्तिक वा सामूहिक तक्रारींची दखल घेवून योग्य ती कारवाई करणे.

४. महाविद्यालयात/ संस्थेत लैंगिक छळ प्रतिबंधक जाणीव जागृतीसाठी विविध उपक्रम हाती घेणे, निकोप दृष्टीकोनाची जोपासना करणे.

५. लैंगिक छळ प्रतिबंधक समितीच्या सदस्यांची नावे सर्वांच्या ठळकपणे नजरेस येतील अशा ठिकाणी प्रदर्शित करणे

६. समितीच्या कार्यपध्दतीची सर्वांना माहिती करून देणे व त्यासाठी उपक्रमांचे संयोजन करणे

७. महाविद्यालय/ संस्थेच्या माहितीपत्रकात यासंबंधीचा आवश्यक तो तपशील देणे

लैंगिक छळाबाबत आलेल्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी विहीत कार्यपध्दती -

१. महाविद्यालय/ संस्थेशी, विद्यार्थिनी/ प्राध्यापिका/ कर्मचारी/ अभ्यागत आदी नात्याने संबंधित कोणतीही महिला वा बाहेरीलही महिलेस, महाविद्यालय/ संस्थेशी संबंधित विद्यार्थी/

कर्मचारी/ संस्था सदस्य वा अन्य पुरूष व्यक्ती आणि बाहेरील थर्ड पार्टी विरूध्द लैंगिक छळाबाबत तक्रार करण्याचा हक्क राहील. तक्रार शक्यतो लेखी वा परिस्थितीनुसार तोंडीही स्वीकारता येईल.

२. तक्रार प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत समिती आपल्या बैठकीत तक्रारीची सर्व बाजूंनी शहानिशा करील व लैंगिक छळाचा आरोप असणा-या व्यक्तीस बोलावून स्पष्टीकरण विचारील.

३. तक्रारदार व आरोपी या दोघांनाही आपली बाजू मांडण्याची संधी समिती देईल व त्यावरून आपले निष्कर्ष व निर्णय समिती देईल.

४. तक्रार आल्यापासून जास्तीत जास्त दोन महिन्याच्या आत चौकशी पूर्ण करून समिती आपला अहवाल प्राचार्यांना सादर करील.

५. समितीने केलेल्या शिफारशीनुसार प्राचार्य/ संस्था चालक कारवाई करतील.

६. लैंगिक छळास बळी पडलेली महिला/ साक्षीदार यांना सूडबुध्दीने वागविले जात नाही याची खात्री समिती करील.

७. जर समितीने दिलेला निर्णय मान्य नसेल तर विद्यापीठातील लैंगिक छळ प्रतिबंधक कक्षाकडे जाण्याचा दोन्ही पक्षांना हक्क राहील. मात्र कक्षाने दिलेला निर्णय त्यांच्यावर बंधनकारक राहील.

८. समितीच्या सदस्यांना बैठकीसाठी कोणताही भत्ता वा मानधन दिले जाणार नाही. मात्र समितीचे बाहेरून येणारे सदस्य विद्यापीठ नियमानुसार टी.ए.डी.ए. मिळण्यास पात्र राहतील.

९. जर बाहेरील व्यक्तीकडून (थर्ड पार्टी) लैंगिक छळाचा गुन्हा झाला असेल तर प्राचार्य/ संस्थाचालक गुन्हेगाराविरूध्द लैंगिक छळाची रितसर तक्रार योग्य त्या पोलिस अधिका-याकडे दाखल करतील आणि लैंगिक छळास बळी पडलेल्या महिलेस सहाय्य करतील.

१०. जर इंडियन पिनल कोड वा अन्य कायद्याखाली नोंद करण्यात आलेला विशिष्ट गुन्हा करण्यात आला असेल (उदा. बलात्कार इत्यादी) तर प्राचार्य/ संस्था चालक कायदेशीर रितीने संबंधित पोलिस स्टेशनवर गुन्हा दाखल करतील.

शिक्षा -

१. संस्था चालक/ प्राचार्य/ प्राध्यापक/ कर्मचारी/ विद्यार्थी यांच्यासाठी मायनर वा मेजर शिक्षेसंदर्भातील शिफारशी पुढीलप्रमाणे राहतील-

मायनर/ किरकोळ शिक्षा -

अ. समज, सक्त ताकीद

ब. महाविद्यालय/ संस्था यातून दोन महिन्यापर्यंतच्या काळासाठी निलंबित करणे (प्राध्यापक/ कर्मचारी निलंबित झाला तर आर्थिक हानी होईल पण तो सेवाखंड मानता येणार नाही)

मेजर शिक्षा -

अ. संस्था चालक सदस्यांसाठी -

१. संस्थेचे सदस्यत्व एक वर्षापासून ३ वर्षाच्या कालापर्यंत निलंबित करणे.

२. संस्थेच्या सदस्य पदावरुन काढून टाकणे

ब. प्राचार्य/ प्राध्यापक/ कर्मचारी यांच्यासाठी -

१. किमान एक वर्षासाठी वार्षिक वेतनवाढ रोखणे

२. पदावनती करणे

३. सेवासमाप्ती करणे, नोकरीतून काढून टाकणे, सक्तीची निवृत्ती

क. विद्यार्थ्यांसाठी -

१. परीक्षेस बसण्यास ३ वर्षाच्या कालावधीपर्यंत बंदी (debarment)

२. महाविद्यालयातून काढून टाकणे

३. शिवाजी विद्यापीठ पदव्युत्तर अधिविभागांसाठी / कार्यालयीन कर्मचा-यांसाठी लैंगिक छळ प्रतिबंधक समिती

अ. शिवाजी विद्यापीठाच्या कोल्हापूर व सोलापूर येथील अधिविभागातील विद्यार्थिनी, महिला, अध्यापिका, संशोधक, अभ्यागत महिला आदींच्या लैंगिक छळाबाबतच्या तक्रारींची दखल घेण्यासाठी स्वतंत्र लैंगिक छळ प्रतिबंधक समिती गठित करण्यात येईल. त्या समितीत पुढील सदस्य असतील-

१. दोन शिक्षक - पैकी किमान एक महिला - कुलगुरूंकडून नामनिर्देशित

२. दोन विद्यार्थी प्रतिनिधी - पैकी किमान एक महिला- विद्यार्थी मंडळाकडून नामनिर्देशित

३. एक स्थानिक कायदेतज्ज्ञ/ वकील - कुलगुरूंकडून नामनिर्देशित

४. स्वयंसेवी संघटनांची एक महिला प्रतिनिधी- मा. कुलगुरूंकडून नामनिर्देशित

लैंगिक छळ प्रतिबंधक समितीच्या सदस्यांपैकी किमान ५० टक्के सदस्य महिला असतील. समितीच्या महिला सदस्यांपैकी एक सदस्य मा. कुलगुरू समितीच्या अध्यक्षा म्हणून नियुक्त करतील. समितीच्या सदस्यांचा कार्यकाल ५ वर्षे राहील.

ब. विद्यापीठामधील शिक्षकेतर कर्मचारी महिलांसाठी स्वतंत्र लैंगिक छळ प्रतिबंधक समिती गठित करण्यात येईल. त्या समितीत पुढील सदस्य असतील.

१. दोन डेप्युटी रजिस्ट्रार - पैकी एक महिला- कुलगुरूंकडून नामनिर्देशित

२. वर्ग दोन, तीन व चार कर्मचा-यांमधून एक महिला प्रतिनिधी- कुलगुरूंकडून नामनिर्देशित

३. विद्यापीठाचे कायदे सल्लागार

४. स्थानिक स्वयंसेवी संघटनेची एक महिला प्रतिनिधी- कुलगुरूंकडून नामनिर्देशित

समितीच्या सदस्यांपैकी किमान ५० टक्के सदस्य महिला असतील. समितीच्या महिला सदस्यापैकी एक सदस्य मा. कुलगुरु समितीच्या अध्यक्षा म्हणून नियुक्ती करतील.

शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित मान्यताप्राप्त संस्था व महाविद्यालये, विद्यापीठाचे सोलापूर व कोल्हापूर येथील अधिविभाग आणि कार्यालयीन कर्मचारी महिला यांच्यासाठी त्या त्या ठिकाणी गठित केलेल्या लैंगिक छळ प्रतिबंधक समितीचे निर्णय संबंधित पक्षांना मान्य नसतील तर विद्यापीठ पातळीवरील लैंगिक छळ प्रतिबंधक कक्षाकडे जाण्याचा त्यांना हक्क राहील.

वरील दोन्ही लैंगिक छळ प्रतिबंधक समितींचे अधिकार, कर्तव्ये व विहीत कार्यपध्दती महाविद्यालयीन स्तरावरील लैंगिक छळ प्रतिबंधक समितीनुसार राहतील. मात्र या समितीचे अहवाल मा.कुलगुरूंना सादर करतील.

४. विद्यापीठ पातळीवरील लैंगिक छळ प्रतिबंधक कक्ष -

संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त संस्था तसेच विद्यापीठातील पदव्युत्तर अधिविभाग आणि कार्यालयीन कर्मचा-यांसाठी असलेल्या लैंगिक छळ प्रतिबंधक समित्यांच्या निर्णयाविरूध्द अपिल करण्यासाठी विद्यापीठ पातळीवरती लैंगिक छळ प्रतिबंध कक्षाची स्थापना करण्यात येईल. लैंगिक छळास प्रतिबंध करणे, तत्संबंधी धोरणे ठरविणे आणि लैंगिक छळाबाबत जाणीव जागृती करणे हे या कक्षाचे कार्य असेल.

लैंगिक छळ प्रतिबंधक कक्षाचे सदस्य पुढीलप्रमाणे असतील -

१. शिवाजी विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्राचा/ ची एक प्राध्यापक प्रतिनिधी
२. कुलसचिव
३. व्यवस्थापन परिषदेचे एक सदस्य - मा. कुलगुरूंकडून नामनिर्देशित
४. स्वयंसेवी संस्थामधील एक महिला प्रतिनिधी- मा. कुलगुरूंकडून नामनिर्देशित
५. एक कायदेतज्ज्ञ/ वकील, शक्यतो महिला - मा.कुलगुरूंकडून नामनिर्देशित
६. महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण खात्याचे सचिव अथवा त्यांचे प्रतिनिधी जे डेप्युटी सेक्रेटरीच्या पदाखालचे नसतील.
७. एक प्राचार्य / संचालक - कुलगुरूंकडून नामनिर्देशित
८. पदव्युत्तर अधिविभागांमधील एक प्राध्यापक- कुलगुरूंकडून नामनिर्देशित
९. संलग्नित मान्यताप्राप्त महाविद्यालये/ संस्थामधील एक प्राध्यापक - कुलगुरूंकडून नामनिर्देशित
१०. विद्यापीठ व संलग्नित मान्यताप्राप्त महाविद्यालये/ संस्था यामधील एक शिक्षकेतर कर्मचारी- कुलगुरूंकडून नामनिर्देशित
११. परीक्षा मंडळाचे एक सदस्य - कुलगुरूंकडून नामनिर्देशित

लैंगिक छळ प्रतिबंधक कक्षाचे अधिकार, कार्ये व कार्यपध्दती -

१. लैंगिक छळ प्रतिबंधक कक्षाच्या सदस्यांपैकी किमान ५० टक्के सदस्य महिला असतील. तसेच मा.कुलगुरू कक्षाच्या महिला सदस्यांमधून एक सदस्याची नियुक्ती कक्षाच्या अध्यक्ष म्हणून करतील.

२. कुलसचिव हे कक्षाचे सदस्य - सचिव म्हणून काम पाहतील.

३. सदस्यांचा कार्यकाल ५ वर्षे राहील. मात्र ज्या प्रवर्गाचे प्रतिनिधी म्हणून ते आले असतील त्यातील त्यांचे सदस्यत्व संपुष्टात आल्यास ते कक्षाचे सदस्य राहणार नाहीत.

४. कक्षातील एखादी जागा रिक्त झाल्यास कक्षाचे गठन करताना निर्देशित केलेल्या पध्दतीने अन्य सदस्यांची त्या जागी नियुक्ती करण्यात येईल.

५. कक्षाच्या प्रत्येक वर्षी किमान तीन बैठका होणे अनिवार्य राहील

६. कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत कक्षाने त्याची दखल घेणे आवश्यक आहे.

७. कक्षाच्या बैठकीची गणसंख्या एकूण सदस्यांच्या ३० टक्के राहील

८. सर्व पदव्युत्तर अधिविभाग, कार्यालये व संलग्नित मान्यताप्राप्त संस्था व महाविद्यालये येथे लैंगिक छळ प्रतिबंधक समितीचे कार्य चालू आहे याची खात्री करणे हे कक्षाचे कार्य राहील.

९. कक्षाकडे येणा-या सर्व तक्रारींची नोंद घेवून उभयपक्षी बाजू मांडण्याची संधी देवून योग्य तो निर्णय देणे व त्याची अंमलबजावणी होते आहे हे पाहणे हेही कक्षाचे कार्य राहील. या संबंधातील शिक्षेची तरतूद लैंगिक छळ प्रतिबंध समिती खाली दिलेल्या तरतूदींप्रमाणेच राहील.

१०. लैंगिक छळ जाणीव जागृतीसाठी विविध उपक्रमांचे संयोजन करणे, संलग्नित महाविद्यालये/ संस्था/ पदव्युत्तर अधिविभाग आदी ठिकाणी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी/ पालक/ संस्था चालक/ जनता आदीमध्ये लैंगिक छळ प्रतिबंधक समिती व कक्ष याबद्दलची माहिती पोस्टर्स, नोटीस, आदी द्वारा प्रसृत करणे त्यासाठी कार्यशाळा आदींचे संयोजन करणे, हे कक्षाचे कार्य राहील.

या व्यतिरिक्त अन्य कार्यपध्दती महाविद्यालयीन स्तरावर गठित करण्यात आलेल्या लैंगिक छळ प्रतिबंधक समितीनुसार राहील. मात्र कक्ष आपला अहवाल मा.कुलगुरूंना सादर करील.

WOOMEN

1104-11
2001